जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात आज हेमंत राजोपाध्ये यांचे व्याख्यान

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे हेमंत राजोपाध्ये यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. राजोपाध्ये हे 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. हे व्याख्यान मानव्यशास्त्र सभागृहात दि. २ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के असतील, अशी माहिती समन्वयक प्रा. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात आज हेमंत राजोपाध्ये यांचे व्याख्यान

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने मंगळवारी (दि. २) मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११.३० वाजता हेमंत राजोपाध्ये यांचे 'प्राच्यविद्या आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक प्रा. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2024
पुढारी

# विद्यापीठात आज 'महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच प्रोग्राम'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी (दि. २) सकाळी १०.३० वाजता 'महा-६० कॉर्नेल एक्सिलरेटर प्रोग्राम' अंतर्गत एकदिवसीय 'महा-६० डिस्ट्रिक्ट आऊटरिच' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग, कॉर्नेल युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क (अमेरिका) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात होणार आहे. कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल रेखावार व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती असेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2024
पुढारी

# मनाच्या स्वास्थ्यासाठी योग, संगीत अभ्यास आवश्यक

## डॉ. भाग्यश्री मुळे



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

मनाच्या स्वास्थ्यासाठी योग आणि संगीताचा अभ्यास आवश्यक आहे, असे प्रतिपादन संगीत अभ्यासक डॉ. भाग्यश्री मुळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्यावतीने दोन दिवसीय 'सुगम संगीत' कार्यशाळेत त्या बोलत होत्या. डॉ. मुळे यांनी योगसंगीत व सुगमसंगीताचे विविध पैलू या विषयी मार्गदर्शन केले. योगशास्त्राची विविध तत्वे व संगीत यांची उत्तम सांगड घालणारे अभ्यासपूर्ण विवेचन तसेच सुगम संगीताचे विविध पैलू उलगडताना त्यांनी सुगम, नाद विचार, लय ताल विचार, साहित्य विचार, सौंदर्य विचार, सादरीकरण, मानसशास्त्र, वाद्यवृंद संयोजन आदी मुद्यांविषयी मत स्पष्ट केले. त्यांना निनाद खाडिलकर यांनी स्वरसाथ तर गौरी कुलकर्णी यांनी संवादिनी साथ, संदेश गावंदे यांनी तबलासाथ केली.

पाहुण्यांचे स्वागत विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी केले. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2024

महासत्ता

# डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या संशोधन प्रकल्प 'अन्वेषण' मध्ये अव्वल

कोल्हापूर, ता.३१ (प्रतिनिधी):

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'अन्वेषण' (पश्चिम विभाग) विद्यार्थी संशोधन महोत्सवात डी. वाय पाटील अभिमत विद्यापीठाचा दोन विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांना प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

भारतीय विद्यापीठ महासंघ, दिल्ली (एआययू)आणि शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'अन्वेषण' चे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील तरुणाईमध्ये संशोधकीय दृष्टीकोन आणि सृजनशीलता यांना चालना देण्याच्या हेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या महोत्सवात पदवी स्तरापासून ते पीएचडी संशोधकांपर्यंतच्या अभिनव संकल्पनांवर आधारित संशोधन प्रकल्पांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JAN 2024
सकाळ

# विद्यापीठ हॉकी संघात निरंजन गोईलकर



निरंजन गोईलकर

गडहिंग्लज : येथील डॉ. घाळी महाविद्यालयाचा खेळाडू निरंजन गोईलकर याची शिवाजी विद्यापीठाच्या हॉकी संघात निवड झाली. भोपाळ येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत निरंजन शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. संस्थेचे सहसचिव गजेंद्र बंदी यांच्या हस्ते निरंजनचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवानंद मस्ती यांचे प्रोत्साहन मिळाले. प्रा. विकास अतिग्रे, मनोहर मांगले यांचे मार्गदर्शन मिळाले.